।। श्रम ही आराधना ।।

# महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ

(संलग्न भारतीय मजदूर संघ) (र.नं.पी.एन.३१७८)

| निलेश खरात | सचिन मेंगाळे | उमेश आणेराव | राहुल बोडके | सागर पवार |
|---|---|---|---|---|
| अध्यक्ष | सरचिटणीस | कार्याध्यक्ष | संघटन मंत्री | कोषाध्यक्ष |
| मो.: ९८२२४१८३९५ | मो.: ९४२२०३७०२९ | मो.: ९९७०००४४७४ | मो.: ९५५२८७४८२१ | मो.: ९८९०१६९६६७ |

● mvkksangh@gmail.com ● विश्वकर्मा भवन, १८५, शनिवार पेठ, पुणे - ४११०३० ● www.mvkksangh.com

**जा. क्र.: एम.व्ही.के.के.एस./एन/**2019/10 **दिनांक :** 10/07/2019

प्रति

**मा. ना.चंद्रशेखरजी बावनकुळे**

**ऊर्जामंत्री**

**महाराष्ट्र राज्य**

10/7/19

मंत्री, ऊर्जा, ... राज्य उत्पादन ... महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

**विषय : सरळ सेवा भरती करताना वीज कंत्राटी कामगारांची सेवा विचारात घेऊन त्यांना न्याय देणे बाबत**

**संदर्भ : 1) सेवायोजन जाहिरात क्रमांक 5/2019**

**2) सेवायोजन जाहिरात क्रमांक 4/ 2019**

माननीय महोदय,

संदर्भीय जाहिरातीनुसार महावितरण कंपनीने दिनांक 5/7/2019 रोजी विद्युत सहाय्यक आणि उपकेंद्र सहाय्यक या पदांकरीता सरळ सेवा भरती प्रक्रिया बाबत वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध केलेली आहे. त्या अन्वये 3 वर्षाच्या अनुभवाच्या आधारे त्यांना नियमित कर्मचाऱ्यांच्या अनुक्रमे तंत्रज्ञ आणि यंत्रचालक या पदांवर सामावून घेण्याचे धोरण वीज कंपनीने ठरवलेले आहे. महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे प्रमुख पदाधिकारी तसेच पुणे कोथरूड विधानसभा मतदार संघाच्या लोकप्रतिनिधी माननीय मेधाताई कुलकर्णी, तसेच वीज कंपनी प्रशासनासोबत म.रा.वी.मं सूत्रधारी कंपनीच्या मुंबई, फोर्ट. येथील ऑफिस मध्ये दिनांक 27 फेब्रुवारी 2019 रोजी आपल्या अध्यक्षते खाली संयुक्तिक चर्चा झाली होती. या चर्चेदरम्यान या कंत्राटी कामगारांना कंत्राटदार विरहित व त्यांच्या सेवा निवृत्तीच्या वयापर्यंत शाश्वत रोजगार व सेवाशर्तो मध्ये सुधारणा करण्याबाबत आपण सकारात्मक घोषणा या बैठकीत केल्या होत्या.

या भरती प्रक्रियेमुळे महावितरण कंपनी मधील अनेक रिक्त पदांच्या जागेवर तसेच कामाच्या गरजेनुसार हजारो वीज कंत्राटी कामगार सलग व नियमितपणे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ ते आज रोजी असलेल्या महावितरण कंपनी मध्ये काम करत असताना एका बाजूला दिनांक 27 फेब्रुवारी 2019 व दिनांक 28 मे 2019 रोजी झालेल्या चर्चेनुसार आपण जी आश्वासने दिली होती त्यांची अंमलबजावणी होण्याची वाट कंत्राटी कामगार बघत असतानाच ही भरती प्रक्रिया राबवली गेली. या भरतीमध्ये वर्षानुवर्षे काम करणाऱ्या व अनुभवी अशा वीज कंत्राटी कामगारांना वयामध्ये सवलत/ सूट अथवा अनुभवी कंत्राटी कामगारांना काही प्रमाणात आरक्षण मिळेल असे वाटत असतानाच दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी झाली नाही आणि भरतीमध्ये सुद्धा या अनुभवी कंत्राटी कामगारांना प्राधान्य मिळाले नाही. या मुळे राज्यातील हजारो कंत्राटी कामगारांमध्ये प्रचंड नाराजी व असंतोष निर्माण झाला असून हे कामगार या भरती मुळे बेरोजगार होण्याची भीती महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघास वाटत आहे. तरी कृपया माननीय मंत्री महोदय यांनी ही भरती प्रक्रिया तातडीने थांबवून थंडी, ऊन, वारा, वादळ, पाऊस या बिकट परिस्थितीत अत्यंत कमी वेतनात काम करत कुटुंबाची उपजीविका चालवणाऱ्या कामगारांनी या वीज कंपन्यांचे अब्जावधी रुपये वाचवले आहेत तसेच या कामगारांच्या योगदानामुळे महावितरण कंपनीचे आशिया खंडामध्ये नावलौकिक देखील झाले आहे. त्यामुळे महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघास दिलेल्या आश्वासनाची आपण तातडीने पूर्तता करावी अशी संघटनेच्या वतीने आपणास नम्र विनंती करत आहे.

आपला

सचिन मेंगाळे

सरचिटणीस, महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ